उप पो. स्टे. उमरी पोतदार चंद्रपूर जिल्हा

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

PDF Compressor Free Version

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर  **P.S.(ठाणे):** उमरी पोतदार सब

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0044  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/10/2023 22:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 05/10/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/10/2023
**Time From (वेळेपासून):** 16:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 06/10/2023  **Time (वेळ):** 20:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 018
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/10/2023 21:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उमरी पोतदार, ग्राम पं उमरी पोतदार,पोंभुर्णा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

PDF Compressor Free Version

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कपिलदास मधुकर ठाकरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उमरी पोतदार,उमरी पोतदार,पोंभुर्णा,उमरी पोतदार सब,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उमरी पोतदार,उमरी पोतदार,पोंभुर्णा,उमरी पोतदार सब,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | देवानंद मुर्लीधर गेडाम | | | 1. उमरी पोतदार ,ग्राम पं उमरी पोतदार,पोंभुर्णा ,उमरी पोतदार सब,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | ध्वनी उपकरणे | सॅन्डीक्स कंपनीचे 32 जिबी क्षमता असलेले 02 मेमोरी कार्ड | 0.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 26 नोटा. | 13,000.00 |

PDF Compressor Free Version



| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 3 | इतर | घरगुती वस्तु | क्रिम रंगाचे फुलपॅन्ट | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

13,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 06/10/2023 मी श्रीकपिलदास मधुकर ठाकरे, वय 41 वर्षे, धंदा-शेती, रा.उमरी पोतदार, ता.पोभुर्णा जि. चंद्रपुर येथे आपले परिवारासह राहतो व शेती तसेच छोटे मोठे बांधकाम ठेके घेण्याचे काम करित असतो. ग्रामपंचायत उमरी पोतदार येथे 15 व्या वित्त आयोगामधुन सन 2021-2022 मध्ये जिल्हा परिषद चंद्रपुर अंतर्गत योगा शेड बांधकामांचे काम अंदाजे किं. 3,49,321/-रू. चे आल्याने सदर बांधकामाकरिता साहित्य पुरवठा करण्याचे काम हे श्री राजेंद्र केशव मोरे रा. नवेगाव मोरे ता. पोंभुर्णा जि. चंद्रपुर यांना देण्यात आले होते. श्री राजेंद्र मोरे यांनी मला योगा शेड बांधकामाकरिता लागणारे साहित्य पुरवठा करण्याकरिता व रक्कमेची उचल करण्याकरिता करारनामा/संमतीपत्र माझे नावांनी करून दिला होता. त्यामुळे मी ग्रामपंचायत उमरी पोतदार हद्दीत योगा शेड बांधकाम करिता स्वत: साहित्य पुरवठा करून तसेच सदर कामाकरिता लागणारे माझे गावातील मजुरांना नेमुन व मी स्वत: मजुर म्हणुन काम करून योगा शेड बांधकाम मी माहे जुन/2023 मध्ये पुर्ण केले. सदर कामासाठी त्यापैकी मटेरिअल व साहित्य खरेदी करिता लागलेले 2,44,525/-रू. ग्रामपंचायत उमरी पोतदार येथिल ग्रामसेवक श्री देवानंद गेडाम यांनी श्री राजेंद्र मोरे यांना चेकव्दारे देण्यात आलेले आहे. उर्वरित 1,04,700/-रू मजुरांचे पेमेंट शिल्लक असुन बरेच दिवस होवुनही सदर कामाकरिता वापरण्यात आलेल्या मजुर यांचे पेमेंट न मिळाल्याने मी दिनांक 04/10/2023 रोजी दुपारी अंदाजे 12/00 वा. दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय उमरी पोतदार येथे जावुन ग्रामसेवक श्री देवानंद गेडाम यांना भेटुन मजुरांचे पेमेंट बाबत विचारणा केली असता ग्रामसेवक श्री देवानंद गेडाम यांनी '' तुमचे मटेरिअल व साहित्य खरेदी करिता लागलेले 2,44,525/-रू. चे चेक श्री. राजेंद्र मोरे यांना प्रदान करण्यात आलेले असुन उर्वरित मजुरांचे पेमेंट पाहिजे असेल तर ग्रामपंचायत उमरी पोतदार अंतर्गत झालेल्या योगा शेड बांधकामाच्या संपुर्ण कामाचे पाच टक्के प्रमाणे 17,500 रू/- द्यावे लागतील, अन्यथा मजुरांचे पेमेंट करणार नाही'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना नाइलाजास्तव होकार देवुन सध्या माझेकडे रूपये नाहीत रूपये जमविल्यानंतर तुम्हाला दोन-तिन दिवसांनी भेटतो असे सांगितले व तिथुन निघुन आलो. माझी गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी दिनांक 05/10/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे अंदाजे दुपारी 4/00 वा.हजर येवुन लेखी तक्रार देत आहे. तरी माझा गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांचेशी कोणताही खाजगी आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. सध्या माझेकडे जमा झालेले 17,500/-रू. लाचरक्कम म्हणुन आवश्यक असलेली रक्कम माझे वैयक्तिक बचतीतुन जमा झालेले 17,500/-रू.आपणाकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत आहे. तरी 15 व्या वित्त आयोगामधुन योगा शेड बांधकामामधील साहित्य पुरवठा व मजुराचे पेमेंट असे एकत्रित अंदाजे किं. 3,49,321/-रू. चे कामांवर पाच टक्के प्रमाणे 17,500/-रू. ची लाच मागणारे गै.अ.देवानंद गेडाम ग्रामसेवक, उमरी पोतदार यांचेविरूध्द कार्यवाही होणेस लेखी तक्रार देत आहे अश्या आशयाची लेखी तक्रार दिली ्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. गुरनुले साहेब यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या स्टॉफची ओळख करुन देउन पो.कॉ अमोल सिडाम यांना दोन पंच घेवुन येण्याबाबत मा. उपसंचालक, भुविज्ञान व खनिकर्म, संचालनालय प्रादेशिक कार्यालय चंद्रपुर यांना पत्र दिले त्यावरून दोन पंच आणल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचाना स्टॉफची ओळख करून देउन त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. गुरनुले साहेब यांनी दिलेल्या सुचने वरुन नापोकॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉइस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर

PDF Compressor Free Version

पोलीस निरीक्षक श्री.गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉइस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.गुरनले साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 17,500/- (रू.500/- दराच्या 35 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. व लाच रक्कम असलेला लिफाफा श्री. गुरनुले साहेब यांनी त्यांचे ताब्यात ठेवला. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 01 मध्ये घेण्यात आल्या).त्यानंतर श्री गुरनुले साहेब यांनी मला गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार हे कुठे मिळतील असे विचारले असता श्री. गुरनुले साहेब यांना सांगितले कि, सायंकाळ झाल्यामुळे ग्रामपंचायत कार्यालय उमरी पोतदार हे बंद झाले असल्याने गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार हे कार्यालय मिळुन येणार नाही. त्यामुळे गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांचे विरूध्द पडताळणी तथा सापळा कार्यवाही उदईक दिनांक 06/10/2023 रोजी करण्यात यावे असे मी सांगितले. त्यावरून श्री गुरनुले साहेब यांनी मला सांगितले कि, दिनांक 06/10/2023 रोजी सकाळी ठिक 11/15 वा. मौजा उमरी पोतदार सुरक्षित ठिकाणी थांबून राहण्याची समज दिली व ते सुध्दा कार्यालयीन स्टाफ व पंचासह सकाळी 11/15 वा. पर्यंत मौजा उमरी पोतदार येथिल सुरक्षित ठिकाणी येत असल्याचे सांगितले. त्यावरून श्री गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंच व सापळा पार्टीतील कर्मचा-याना गोपनियता बाळगण्याच्या सुचना करुन सदरची पडताळणी/सापळा पंचनामा कार्यवाही उदया दिनांक 06/10/2023 रोजी करण्यात येईल असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.
यानुसार मी दिनांक 06/10/2023 रोजी सकाळी 11/15 वा. दरम्यान मौजा उमरी पोतदार येथील जंगल परिसरात सुरक्षित ठिकाणी हजर असताना श्री. गुरनुले साहेब हे त्यांचे कार्यालयीन स्टाफ व पंचासह मी हजर असलेल्या ठिकाणी आले. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांनी पंचासमक्ष पंचनामा क्र 01 मध्ये नमुद असल्याप्रमाणे कार्यवाही थोडक्यात समजावुन गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यांचे सुचनेवरुन ना.पो.कॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मी सोबत आणलेल्या हिरो होंडा स्प्लेंडर प्रो दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-ए.एल. 4631 नी पंच क्र. 01 यांचेसह ग्रामपंचायत कार्यालय उमरी पोतदार या ठिकाणी गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांचेकडे पडताळणी करीता पाठविले.
पडताळणी कार्यवाही दरम्यान गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांनी मला '' पाच टक्के, स्टेटमेंट बनवा लागते स्टेटमेंट बनवुन चेक द्यावे लागते आता दहाजनाचे दहा चेक नाही परवडत नं एकच चेक बनवुन द्यायचं दहाजनाचे दहा चेक कसे होईल, चार टक्के द्या मोकळे व्हा'' असं म्हणाले त्यावर मी त्यांना ''पहा बर चार टक्केन किती होते. जास्तच घेवुन राहिले असे म्हणालो. त्यावर गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांनी'' चौदा, तेरा नवशे बाहत्तर, तेरा हजार द्या, वरचे नवशे बहात्तर नको द्या'' असे म्हणुन तडजोडीअंती 13,000 रूपये/- लाचरक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने पडताळणी कार्यवाही करुन परत आलो व पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. तदनंतर पोनि. गुरनुले साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष यांनी गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांचेविरूद्ध पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. पंचनामा क्र 1 प्रमाणे मला अँथ्रॅसिन पावडर लावलेली 17,500/-रूपयांपैकी मला तडजोडीअंती 13,000/-रू लाचेची मागणी झाली असल्याने 13,000/-रू रक्कम माझे निळया रंगाच्या जिन्सपॅन्ट चे समोरील बाजुचे उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाई वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे गळयातील पांढऱ्या रंगाचा दुपट्टा गळयातुन काढुन चेहरा पुसुन डाव्या हातात ठेवुन लाचरक्कम दिल्याबाबतचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर श्री. गुरनुले साहेब यांचे सुचनेवरुन नापोकॉ. संदेश वाघमारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मी सोबत आणलेल्या हिरो होंडा स्प्लेंडर प्रो दुचाकी वाहन क्र. एम.एच.34-ए.एल. 4631 नी पंच क्र. 01 यांचेसह ग्रामपंचायत कार्यालय उमरी पोतदार या ठिकाणी जाण्यास रवाना केले व सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. 01

PDF Compressor Free Version

ग्रामपंचायत उमरी पोतदार या ठिकाणी गेलो असता त्या ठिकाणी गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार हे ग्रामपंचायत उमरी पोतदार येथिल ग्रामसेवक कक्षात हजर होते. त्यांचेशी बोलणी दरम्यान गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांनी मला इशा-याने पैसे आणले काय अशी विचारणा केली असता मी ग्रामसेवक देवानंद गेडाम यांना माझे कडील पॅन्टचे उजव्या खिशात असलेले लाच रक्कम 13000/- रू. दिले असता ग्रामसेवक देवानंद गेडाम यांनी मला ''किती आहेत, असे विचारले असता मी त्यांना तेरा हजार आहेत, तेरा हजार तुम्ही म्हणाले होत न असे म्हणालो असता ग्रामसेवक देवानंद गेडाम यांनी हो असे म्हणुन ते पैसे आपले उजवे हाताने स्विकारले असता मी त्यांना ''पहा मोजुन घ्या'' असे म्हणालो असता गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांनी ''हो, विश्वास आहे गा, विश्वास असल्यावर तर नाही'' असे म्हणुन माझेकडुन घेतलेले 13,000/- रूपये लाच रक्कम हि आपले क्रिम रंगाचे फुलपॅन्टमध्ये उजव्या बाजुचे समोरील खिश्यात ठेवले. त्यानंतर मी ग्रामपंचायत उमरी पोतदार कार्यालयाचे मुख्य प्रवेशव्दारजवळ येवुन सापळा पथकास माझे गळ्यातील पांढऱ्यां रंगाचा दुपट्टा गळ्यातुन काढुन चेहरा पुसुन डाव्या हातात ठेवुन गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गै.अ.देवानंद गेडाम, ग्रामसेवक, उमरी पोतदार यास लाच घेतल्याने पकडुन पुढील कारवाइ केली. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 02 मध्ये घेण्यात आल्या) तरी देवानंद मुर्लीधर गेडाम, वय-51 वर्षे, व्यवसाय नौकरी-पद ग्रामसेवक, ग्रामपंचायत उमरी पोतदार ता. पोभुर्णा जि. चंद्रपुर यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून 15 व्या वित्त आयोगामधुन योगा शेड बांधकामामधील साहित्य पुरवठा व मजुराचे पेमेंट असे एकत्रित अंदाजे किं. 3,49,321/-रू. चे कामांवर पाच टक्के प्रमाणे 17,500/-रू. ची लाचेची मागणी करून तडजोडीअंती 13,000/-रूपये लाच रक्कमेची पंचासमक्ष मागणी करुन माझेकडुन लाचेची रक्कम 13,000/-रूपये स्वीकारली.उर्वरित फिर्याद हि मुळ फिर्यादि प्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

KISHOR ANANDRAO SHERKI(SI (Sub-Inspector)) / 14801000362KASM8101C **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

PDF Compressor Free Version

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in-charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KISHOR ANANDRAO
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 14801000362KASM810

स्टेशन हवालदार अंमलदार
पो. स्टे. उमरी पोतदार

PDF Compressor Free Version

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)